# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:03.12.2025** **वार:बुधवार**

1. राज्यातील सर्व 288 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींची मतमोजणी 21 डिसेंबर रोजी करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे निर्देश
2. राज्यातल्या 264 नगरपंचायती आणि नगरपरिषदांसाठी उत्साहात मतदान
3. कुंभमेळ्याचं पावित्र्य टिकवून विकासाबरोबरच वारशाचंही जतन करणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही आणि
4. विद्यापीठस्तरीय खेलो इंडिया स्पर्धेत ॲथलेटिक्समध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंची शानदार कामगिरी

**<u>निकाल</u>**

राज्यातील सर्व 288 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींची मतमोजणी येत्या 21 डिसेंबर रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. त्याचबरोबर मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्षही 20 डिसेंबर रोजी मतदान संपल्यानंतर पुढील अर्ध्या तासापर्यंत जाहीर करता येणार नाहीत, असंही न्यायालयानं म्हटलं आहे. न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगानं राज्य निवडणूक आयोगानेही संबंधित सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत.

दरम्यान राज्यातील 264 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी काल मतदान झालं. तसंच सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार 24 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या अध्यक्षपदांसह सर्व सदस्यपदांसाठी आणि 76 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमधील 154 सदस्यपदांच्या जागांसाठी 20 डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. या सर्व ठिकाणी आता 21 डिसेंबर रोजी सकाळी 10 वाजल्यापासून मतमोजणी सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**<u>मतदान</u>**

राज्यातल्या 264 नगरपंचायती आणि नगरपरिषदांसाठी काल मतदान झालं. काही अपवाद वगळता मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. वाशिम जिल्ह्यातील तीन नगरपरिषदा आणि एका नगरपंचयातीसाठी एकंदर 65 पूर्णांक 47 टक्के, नांदेड जिल्ह्यातील दहा नगरपरिषदा आणि एका नगरपंचायतीसाठी एकंदर 74 पूर्णांक 75 टक्के, रत्नागिरी जिल्ह्यातील चार नगर परिषदा आणि तीन नगर पंचायतींच्या निवडणुकांसाठी 68 पूर्णांक 14 टक्के, तर कोल्हापूर जिल्ह्यातील 10 नगरपरिषदा, 3 नगरपंचयातींसाठी एकंदर 78 पूर्णांक 87 टक्के मतदान झाल्याचं आमच्या प्रतिनिधींनी कळवलं आहे.

जालना जिल्ह्यात भोकरदन आणि परतूर, तर, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठणमधल्या तीन केंद्रांवर मतदान यंत्र बंद पडल्याचा प्रकार घडला. मात्र, संबंधित विभागानं तातडीने तांत्रिक अडचण दूर केल्यानंतर मतदान सुरळीत झालं. रत्नागिरी जिल्ह्यातल्या राजापूरमधल्या 95 वर्षं वयाच्या शैला मालपेकर यांनी नगर परिषद निवडणुकीत मतदान केलं. सांगली जिल्ह्यातील शिराळा इथले एक मतदार, अन्सार मुल्ला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी ऑस्ट्रेलियातून भारतात आले होते. लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी झाल्यानंतर आकाशवाणीकडे आपलं मनोगत व्यक्त करताना अन्सार मुल्ला म्हणाले....

**मला असं वाटतंय की लोकशाहीने जो आपल्याला व्होटिंग करायची जी पॉवर दिली आहे, त्याचा लाभ सगळ्यांनी घ्यावा आणि आपल्या भारत देशाला भक्कम करावं. मी सर्व यूथ जनरेशन ला आव्हान देतो की या लोकशाहीने जी आपल्याला पॉवर दिली आहे त्याचा युज करून सगळ्यांनी भारत देशाला विकास आणि प्रगतीच्या मार्गावर घ्यावं.**

**हिवाळी अधिवेशन**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या कालच्या दुसऱ्या दिवशीही मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणासह इतर मागण्यांवर चर्चा करण्याची मागणी करत विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणाबाजी सुरूच ठेवली. विरोधकांच्या गदारोळामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज आधी दुपारपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**संचारसाथी**

'संचारसाथी' हे मोबाईल ॲप ऐच्छिक असल्याचं, केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी स्पष्ट केलं आहे. ते काल संसद भवन परिसरात वार्ताहरांशी बोलत होते. एखाद्या व्यक्तीला हे ॲप नको असेल, तर ती व्यक्ति ते ॲप मोबाईलमधून काढून टाकू शकते, असं शिंदे यांनी सांगितलं. 'संचार साथी' ॲपमुळे सुमारे पावणे दोन कोटी बनावट मोबाईल कनेक्शन खंडित केल्याची माहिती शिंदे यांनी दिली. चोरीला गेलेले 20 लाख मोबाईल शोधण्यात या ॲपमुळे यश आल्याचं, तसंच यापैकी सात लाख मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना परत केल्याचंही शिंदे यांनी सांगितलं.

**लोकभवन**

पंतप्रधान कार्यालयाचं नामकरण सेवातीर्थ, केंद्रीय सचिवालयांचं नामकरण कर्तव्यभवन तर राजभवनाचं नामकरण लोकभवन करण्यात येत असल्याची घोषणा काल केंद्र सरकारनं केली. त्यानुसार महाराष्ट्र राजभवनचे नाव आता 'महाराष्ट्र लोकभवन' असे करण्यात आले आहे. महाराष्ट्र आणि गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी या संदर्भात राजभवन सचिवालयाला निर्देश दिले आहेत.

**नाशिक- क्लीन गोदावरी बॉन्ड**

नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याचं पावित्र्य टिकवून विकासाबरोबरच ऐतिहासिक वारशाचंही जतन करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. 2027 मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभ मेळयाच्या अनुषंगानं नाशिक महानगरपालिकेचे 'एनएमसी क्लीन गोदावरी बॉण्ड्स' काल राष्ट्रीय शेअर बाजारात मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सूचिबद्ध करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. गोदावरीच्या स्वच्छतेसाठी नागरिक आणि गुंतवणूकदारांनी दिलेला उत्स्फूर्त सहभाग अत्यंत कौतुकास्पद आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**भारतीय उलूक महोत्सव**

पुण्यातील इला फाउंडेशन आणि टाटा मोटर्स कमर्शियल व्हेईकल्स यांच्या वतीनं सहावा 'भारतीय उलूक महोत्सव' उद्यापासून 6 डिसेंबरपर्यंत पुरंदर तालुक्यातील इला हॅबिटॅट, इंगोरी इथं आयोजित करण्यात आला आहे. मानव-पक्षी संबंधाच्या अभ्यासक, इला फाउंडेशनच्या उपाध्यक्ष आणि या महोत्सवाच्या आयोजक डॉ. सुरुची पांडे यांनी याविषयी अधिक माहिती दिली....

**शेतकऱ्यांचा मित्र, धान्य लक्ष्मीचे वाहन आणि बुद्धीचे प्रतीक असणारा उलुक म्हणजेच घुबड हा निशाचर पक्षी.. याच पक्ष्याबद्दल शास्त्रीय सांस्कृतिक आणि पर्यावरणीय माहिती घेण्याची संधी आहे उलुक उत्सवात... सहावा भारतीय उलुक उत्सव घुबडविषयक कलाप्रदर्शनात दोनशेहून अधिक शाळांचा सहभाग, देश विदेशातून आलेल्या असंख्य कलाकृती, घुबडाबद्दलचे माहितीपट, छायाचित्रे, नृत्य, गाणी, नाटिका, पुस्तके आणि वस्तू पाहण्याची संधी आहे. घुबड चित्रांचे फेस पेंटिंग आणि मेंदी अनुभवण्याची गंमतदेखील यात आहे. तज्ज्ञांशी संवाद आहे. तर घुबडांबद्दल जास्त जाणून घेऊया त्यांना अंधश्रद्धेच्या विळख्यातून सोडवूया....**

**पुणे पुस्तक महोत्सव**

वाचन संस्कृतीला चालना देण्याच्या उद्देशानं पुणे पुस्तक महोत्सवाच्या माध्यमातून काम होत आहे. या महोत्सवाच्या अनुषंगानं यंदाही 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम येत्या 9 डिसेंबरला संपूर्ण पुण्यात राबविण्यात येणार आहे. ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर येत्या 13 ते 21 डिसेंबर या कालावधीत राष्ट्रीय पुस्तक न्यास म्हणजे एन बी टी च्या वतीनं पुणे पुस्तक महोत्सव होत आहे. या अनुषंगाने शांतता पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम येत्या 9 डिसेंबरला सकाळी 11 ते 12 या कालावधीत राबविण्यात येणार आहे. यंदाही या उपक्रमाची नोंद विश्वविक्रमात करण्याचं संयोजकांचं उद्दिष्ट आहे. वाचकांनी 9 डिसेंबरला सकाळी 11 ते 12 या वेळेत आपल्या आवडीच्या पुस्तकाचं वाचन करून पुस्तक वाचन करतानाचं छायाचित्र पुणे पुस्तक महोत्सवाच्या https://photoupload.pbf25.in या वेबसाइटवर अपलोड करावं असं आवाहन, महोत्सवाचे संयोजक आणि जिल्हा प्रशासनानं केलं आहे. या संपूर्ण उपक्रमाची माहिती पुणे पुस्तक महोत्सवाच्या सोशल मीडिया हँडलवर मिळू शकेल. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी पुण्याहून शिवराज सणस यांच्यासह संध्या खान**.

**वेदमूर्ती**

राज्यातील अहिल्यानगर इथल्या 19 वर्षीय वेदमूर्ती देवव्रत रेखे यांनी शुक्ल यजुर्वेदीय 'दंडक्रम पारायण' एकट्याने पूर्ण करून दोनशे वर्षांचा विक्रम मोडला आहे. श्रीक्षेत्र काशी इथं गेल्या 50 दिवसांपासून 165 तासांपेक्षा जास्त काळ आणि हे पारायण सुरू होतं. वैदिक मौखिक परंपरेतलं 'दण्डक्रम' हे सर्वाधिक कठीण पारायण पूर्ण करणाऱ्या वेदमूर्ती देवव्रत रेखे याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केलं आहे.

**खेलो इंडिया**

राजस्थानमध्ये सुरू असलेल्या विद्यापीठस्तरीय खेलो इंडिया स्पर्धेत काल ॲथलेटिक्स मध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी शानदार कामगिरी केली. 100 मीटर धावणे शर्यतीत सुवर्ण, रौप्य आणि कास्य पदकावर महाराष्ट्राच्या खेळाडूंनी नाव कोरलं. 20 मीटर चालणे शर्यतीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गायत्री चौधरीने, तर 5 हजार मीटर धावण्याच्या शर्यतीत बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रिंकी पवाराने रूपेरी धाव घेत दिवस गाजवला. नंदूरबारची रिंकी नाशिकमध्ये सराव करत असून विश्व विद्यापीठ स्पर्धेत तिने देशाचे प्रतिनिधित्व केलं आहे. सवाई मानसिंग क्रीडा संकुलातील ॲथलेटिक्स ट्रॅकवर वेगवान धावपटू होण्याचा मान शिवाजी विद्यापीठाच्या ऋषी प्रताप देसाईने संपादन केला. 10 पूर्णांक 53 सेकंदाची वेळ नोंदवून कोल्हापूरच्या ऋषीने बाजी मारली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा लौकिक मेलगे रौप्यपदकाचा मानकार ठरला. मुंबईच्या सोमैय्या विद्याविहार विद्यापीठाच्या जय भोईरने कास्य पदकावर नाव कोरले.

**क्रिकेट**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या मर्यादित षटकांच्या क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज रायपूर इथं खेळवला जाणार आहे. मालिकेत पहिला सामना जिंकून भारत या मालिकेत एक शून्यनं आघाडीवर आहे.

**हवामान**

राज्यात आज देखील थंडीची लाट राहील असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.